# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## ६४व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ३० मे, १९९२ [शनिवार]

वेळ : सकाळी ११-०० वाजता

सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिति कक्ष [खोक्र. ३१३] तिसरा मजला, मंत्रालय.

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. सुशिलकुमार शिंदे<br>नगर विकास मंत्री | – | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान<br>गृहनिर्माण मंत्री | – | सदस्य |
| श्री. मदन बाफना<br>नगर विकास राज्यमंत्री | – | सदस्य |
| श्री. रमेश दुबे<br>अन्न व नागरी पुरवठा<br>व पर्यावरण राज्यमंत्री | – | सदस्य |
| श्री. रामचंद्र ता कदम,<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. प्रभाकर ना. धारकर,<br>विधान परिषद सदस्य | – | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा,<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | – | सदस्य |
| श्री. पी. सुब्रहमण्यम,<br>महानगर आयुक्त | – | सदस्य-सचिव |

गणपूर्ती न होऊ शकल्याने [२ अशासकीय सदस्यांची उपस्थिती नसल्यामुळे] बैठक स्थगित झाली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या [बैठकीचे कामकाज] विनियम, १९७५ मधील नियम १२ खालील तरतूदीनुसार अर्ध्या तासानंतर सभा घेण्याचे ठरले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
तहकूब झालेल्या ६४व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ३० मे, १९९२ [शनिवार]
वेळ : दुपारी ११-३० वाजता
सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष [खो. क्र. ३१३] तिसरा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. सुशिलकुमार शिंदे<br>नगर विकास मंत्री | - | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान<br>गृहनिर्माण मंत्री | - | सदस्य |
| श्री. मदन बाफना<br>नगर विकास राज्यमंत्री | - | सदस्य |
| श्री. रमेश दुबे<br>अन्न व नागरी पुरवठा व पर्यावरण राज्यमंत्री | - | सदस्य |
| श्री. रामचंद्र ता. कदम,<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. प्रभाकर ना. धारकर,<br>विधान परिषद सदस्य | - | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | - | सदस्य |
| श्री. पी. सुब्रहमण्यम<br>महानगर आयुक्त | - | सदस्य-सचिव |

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [६३व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [६३व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही.

प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेतली.

बाब क्र. ३ : माहीम निसर्ग उद्यानाचे व्यवस्थापन व देखभाल - त्यासाठी मान्यता.

३.१ ही बाब मांडताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, पुनर्विचार केल्यानंतर माहीम निसर्ग उद्यानाच्या व्यवस्थापनासाठी तूर्त प्रस्तावित संस्थेमध्ये नियामक मंडळ हे एकच मंडळ असावे आणि नियमांत दुस-या मंडळासंबंधीची म्हणजेच कार्यकारी समितीविषयी केलेली तरतूद वगळण्यात यावी असे वाटते. प्राधिकरणाने ही सूचना मान्य केली.

३.२ त्यानंतर विधी सल्लागारांनी सभेत असे सांगितले की, संस्था निबंधक [धर्मादाय आयुक्त, मुंबई] यांच्याकडून सुचवले जातील ते फेरबदल लक्षात घेऊन संस्थापन समयलेख [ Memorandum of Association ] व नियम मान्य करावे लागतील. निबंधकांनी सुचवलेल्या फेरबदलांचा विचार करून ते स्वीकारण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे असे त्यांनी सुचवले. ही सूचना देखील मान्य करण्यात आली.

३.३ नंतर अध्यक्षांनी अशी सूचना केली की माहीम निसर्ग उद्यानास राजीव निसर्ग उद्यान असे नाव द्यावे. राजीव याचा अर्थ कमळ असे ते म्हणाले. तथापि, एका सदस्याचे मत असे पडले की, राजीव हे नाव, भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्याशी निगडीत आहे असे लोक समजतात तेव्हा त्यासाठी केंद्र सरकारची परवानगी घेणे आवश्यक होईल. त्यावर अध्यक्षांनी अशी सूचना केली की आधी त्यांनी खुलासा केल्याप्रमाणे प्रस्तुत उद्यानास राजीव निसर्ग उद्यान असे नाव द्यावयाचे असून याबाबत केंद्र सरकारला विनंती करावी. तथापी, उद्यानास वरीलप्रमाणे नाव देण्यास केंद्र सरकारशी परवानगी आवश्यक असेल तर शासनाने "राजीव गांधी निसर्ग उद्यान" असे नाव देण्यास परवानगी द्यावी अशी विनंती करावी. राज्य व केंद्र सरकारच्या परवानगीने ही सूचना कार्यान्वित करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानुसार प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ५१४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली "महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था, मुंबई" या नावाची संस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली स्थापन करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीला जोडपत्र "वाय" म्हणून जोडलेले प्रारूप संस्थापन समयलेख [ Memorandum of Association व नियम, संस्थेच्या कार्यकारी समितीसंबंधीच्या तरतूदी वगळण्याचा फेरबदला सापेक्ष

आणि संस्था निबंधक [धर्मादाय आयुक्त, मुंबई] सुचवतील त्या फेरबदलाचा विचार करून जरुर वाटल्यास तसे फेरबदल करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, ही संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदविण्यासंबंधीची पुढील कार्यवाही करण्यास आणि यासंबंधी तदानुषंगिक व आवश्यक वाटेल अशी सर्व प्रकारची कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, माहीम निसर्ग उद्यानास राज्य व केंद्र सरकार परवानगी देईल त्याप्रमाणे "राजीव निसर्ग उद्यान" किंवा "राजीव गांधी निसर्ग उद्यान" असे नाव देण्यात यावे आणि याबाबतीत राज्य व केंद्र सरकारला विनंती करण्यासाठी देखील महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे."

बाब क्र. ४ : विशिष्ट प्रकारच्या विकासविषयक कामासाठी पूर्व परवानगी आवश्यक असल्याबद्दल मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम १९७४ च्या कलम १३ अन्वये मुं. म. प्र. वि. प्रा. ने निर्गमित केलेली अधिसूचना.

प्रदीर्घ चर्चेनंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १० ऑक्टोबर १९९१ रोजी काढलेली अधिसूचना रद्द करण्यासंबंधीच्या बाब टिप्पणीतील प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली आणि त्यानुसार पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५१५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ च्या कलम १३ व मुंबई सर्वसाधारण खंड अधिनियम, १९०४ च्या कलम २१ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा आणि त्या संदर्भात त्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, अधिसूचना क्र. ए/आरडीएम/१०९१/९१० दिनांक १० ऑक्टोबर, १९९१ तात्काळ विखंडीत व रद्द करण्यास मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७अ अन्वये महानगर आयुक्तांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून अधिकृतरित्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात स्वत:च्या सहीनिशी योग्य अधिसूचना प्रसिध्द करण्यास आणि या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पावले उचलण्यासाठी याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ५ : विस्तारीत मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक आराखड्यात किरकोळ फेरबदल [पेण-अलिबाग] [१९८१-२००१]

चर्चेनंतर, प्राधिकरणाने असे ठरविले की [१] विस्तारीत मुंबई महानगर प्रदेशात [पेण-अलिबाग] सुटीतील वास्तव्य स्थानांसाठी [Holiday Homes ] भूखंड क्षेत्राच्या सध्याच्या ५० टक्के ऐवजी बांधीव क्षेत्र २० टक्के पेक्षा अधिक [चटई क्षेत्र निर्देशांक ०.२] होता कामा नये. आणि [२] अशा प्रयोजनासाठी वापरावयाच्या भूखंडाचा आकार सध्याच्या ०.४ हेक्टर ऐवजी १ हेक्टरपेक्षा कमी असता कामा नये. त्यानुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५१६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे सुटीतील वास्तव्य स्थानांच्या व आश्रयस्थानांच्या बाबतीत विस्तारीत मुंबई महानगर प्रदेशासंबंधीच्या विकास नियंत्रण नियमांत पुढीलप्रमाणे फेरबदल करण्याची शासनास शिफारस करीत आहे :

[१] अशा प्रयोजनासाठी कमाल बांधीव क्षेत्र भूखंड क्षेत्राच्या [चटईक्षेत्र निर्देशांक ०.२] २० टक्के इतके राहील आणि

[२] भूखंड क्षेत्र १ हेक्टरहून कमी असणार नाही.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २०चे पोटकलम [२] अन्वये आपल्या अधिकारांचा वापर करून शासनाने या प्राधिकरणाच्या शिफारशी, जनतेच्या सूचना व आक्षेप मागवण्यासाठी प्रकाशित कराव्यात असे शासनाला कळविण्यास व शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

बाब क्र. ६ : मे. मुकंद आयर्न ॲण्ड स्टील वर्क्स लिमिटेड [आता नवीन देण्यात आलेले नाव मुकंद लिमिटेड] ने पवई येथे धारण केलेल्या जमिनीबाबत शासनाचा नगर विकास विभाग, मे. मुकंद लिमिटेड यांच्याबरोबर त्रिपक्षीय करार करण्यास संमती देणे.

मौजे पवई व तिरंदाज, तालुका कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा येथील सुमारे ८६.०४ हेक्टर जमिनीच्या विकासासाठी, पवई क्षेत्र विकास योजनेत काही जमीनधारकाच्या म्हणजे शर्मा व वर्मा वगैरे कुटुंबांच्या बाबतीत त्रिपक्षीय करार करण्याचे शासनाने आधीच मान्य केल्याची प्राधिकरणाने नोंद घेतली आहे. उक्त पवई क्षेत्र विकास योजनेत मे. मुकंद लिमिटेड यांची सुमारे ६.८५५९ हेक्टर जमीन

[कृ. मा. प.]

असून वर निर्दिष्ट केलेल्या त्रिपक्षीय करारात विहीत केल्याप्रमाणे तत्सम अटींवर व शर्तींवर, त्यांनी धारण केलेली जमीन विकसित करण्यास परवानगी देण्याबद्दल विनंती केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सुरु केलेल्या जमीन विकास योजनेचा हा एक भाग असल्यामुळे शर्मा व वर्मा वगैरे कुटुंबांच्या जमिनीबाबत विहीत केल्याप्रमाणे तत्सम अटींवर व शर्तींवर जमीन विकसित करण्यास आवश्यक परवानगी देण्यात यावी आणि राज्य शासन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि जमीनधारक यांच्यामध्ये १९-११-१९८६ रोजी केलेला त्रिपक्षीय करार अंमलात येण्यापूर्वी संपादन कार्यवाही सुरु करणा-या केंद्र सरकारच्या संस्थांनी जर सहा महिन्यांच्या आत ५३ टक्के जमिनीचा देकार स्वीकारला नाही तर तो देकार व्यपगत होईल या फेरबदलांसह परवानगी द्यावी असे प्राधिकरणाने मत व्यक्त केले. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ५१७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ३, पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा आणि त्या संदर्भात त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे खाली नमूद केलेल्या सर्वेक्षण वर्णनाच्या सुमारे ६.८५५९ हेक्टर जमिनीच्या विकासासाठी शासनाचा नगर विकास विभाग आणि मे. मुकंद लिमिटेड यांच्याशी त्रिपक्षीय करार करण्यास मान्यता देत आहे. असा करार १९-११-१९८६ रोजी राज्य शासन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि शर्मा व वर्मा [आणि इतर] यांच्यामध्ये झालेल्या त्रिपक्षीय करारात नमूद केलेल्या तत्सम शर्तींवर करण्यात यावा. मात्र त्यात फेरबदल एवढाच करावा की एकूण जमिनीपैकी ५३ टक्के जमीन नगररचना संचालक यांनी ठरवावयाच्या किमतीस केंद्र शासनाच्या संस्थांना देऊ करण्यात येईल आणि जर हा देकार सहा महिन्यांच्या आत स्वीकारण्यात आला नाही तर तो व्यपगत होईल.

| सर्वेक्षण क्र. | सीटीएस क्र. | एकूण क्षेत्र [चौरस यार्डात] | एकूण क्षेत्र [चौरस मीटर] |
|---|---|---|---|
| ८ भाग | १५ भाग | ८२,००० | ६८,५५९ |
| ८ भाग | १६ भाग | | |
| १६ भाग | २४ भाग | | |
| १७ भाग | १३ भाग | | |

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वर नमूद केलेला त्रिपक्षीय करार झाल्यावर संपादनातून ही जमीन वगळण्यासाठी मेसर्स मुकंद लिमिटेड मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेला आपला दावा बिनशर्त मागे घेतील.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मे. मुकंद लिमिटेड यांनी धारण केलेल्या जमिनीचा विकास करणे सुलभ व्हावे यासाठी त्रिपक्षीय करार तयार करून तो पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी राज्य शासनाकडे सादर करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ७ : कल्याण समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी असलेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या चौथ्या प्रकरणाबाबतीत अंबरनाथ, बदलापूर व उल्हासनगर नगरपालिकांना शक्तीचे प्रत्यायोजन.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५१८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १५१ [३] खाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला, उक्त अधिनियमाच्या चौथ्या प्रकरणाखाली अधिसूचित क्षेत्राचे एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राच्या सीमा क्षेत्राबाबतीत प्रयोज्य असलेल्या सर्व शक्ती अंबरनाथ, बदलापूर व उल्हासनगर नगरपालिका क्षेत्रांसाठी त्या-त्या नगरपालिकेच्या मुख्याधिका-यांना प्रयोज्य राहतील."

बैठक संपण्यापूर्वी, महानगर आयुक्त यांनी, माननीय नगर विकास मंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी १ जून, १९९२ पासून दिलेल्या राजीनाम्याचा निर्देश केला आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष असताना त्यांनी बजावलेल्या बहुमोल व उत्कृष्ट सेवेचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख दप्तरी दाखल करावा अशी प्राधिकरणास विनंती केली. प्राधिकरणाने या प्रस्तावाचे आनंदाने स्वागत केले आणि पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५१९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण श्री. सुशिलकुमार शिंदे यांनी ८ मार्च १९९० पासून आजवर प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून

बजावलेल्या बहुमोल व उत्कृष्ट सेवेचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख दप्तरी दाखल करीत आहे आणि त्यांना पुढील कारकिर्दीत अधिकाधिक यश मिळो अशी शुभेच्छा व्यक्त करीत आहे."

तदनंतर अध्यक्षांनी यथोचित शब्दांत प्राधिकरणाचे आभार मानले.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभेचे कामकाज समाप्त झाले.

----

# MINUTES OF THE 64TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 30th May, 1992 (Saturday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : Committee Room (Room No.313) in the Office of the Hon'ble Minister for Urban Development, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Sushilkumar Shinde, Minister for Urban Development. | - Chairman |
| Prof.Javed Khan, Minister for Housing. | - Member |
| Shri Madan Bafna, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Ramesh Dube, Minister of State for Food & Civil Supplies and Environment. | - Member |
| Shri R.T. Kadam, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri Prabhakar N. Dharkar, M.L.C. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

As the quorum was not present (2 non-official members) the meeting adjourned. As provided under Rule 12 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975, it was decided to meet after half an hour.

-.-.-.-.-.-.-.-.-

# MINUTES OF THE ADJOURNED 64TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 30th May, 1992 (Saturday)

TIME : 11.30 A.M.

PLACE : Committee Room (Room No.313) in the Office of the Hon'ble Minister for Urban Development, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Sushilkumar Shinde, Minister for Urban Development. | - Chairman |
| Prof.Javed Khan, Minister for Housing. | - Member |
| Shri Madan Bafna, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Ramesh Dube, Minister of State for Food & Civil Supplies and Environment. | - Member |
| Shri R.T. Kadam, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri Prabhakar N. Dharkar, M.L.C. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

ITEM NO. 1 : Confirmation of the minutes of the last (63rd) meeting of the Authority.

The minutes were confirmed.

ITEM NO. 2 : Action taken on the minutes of the last (63rd) meeting of the Authority.

The action taken report was noted by the Authority.

ITEM NO. 3 : Scheme for Management and Maintenance of Mahim Nature Park - approval for

3.1 While introducing the item, the Metropolitan Commissioner stated that on reconsideration it was felt that for the time being there should be only one authority of the proposed Society, viz. the Board of Governors for the management of Mahim Nature Park and that the provisions regarding another body, viz. the Executive Committee made in the Rules be deleted. The Authority agreed with the suggestion.

3.2 The ....

3.2 The Legal Adviser then informed the meeting that the Memorandum of Association and the Rules will have to be approved subject to such modifications as may be suggested by the Registrar of Societies (The Charity Commissioner, Bombay). He suggested that the Metropolitan Commissioner may be authorised to consider and accept the modifications as suggested by the Registrar. This suggestion was also agreed to.

3.3 The Chairman next suggested that Mahim Nature Park be named as Rajiv Nature Park. He stated that Rajiv means lotus. It was, however, felt by one of the members that since the name Rajiv is closely associated with the India's late beloved Prime Minister, Bharat Ratna Rajiv Gandhi, permission of the Union Government would be necessary. The Chairman thereupon suggested that the Union Government be approached in the matter stating that Park is proposed to be named as Rajiv Nature Park as explained by him earlier. However, if permission for naming the park as above is necessary, then the Government may grant permission for naming the park as 'Rajiv Gandhi Nature Park'. It was decided to implement this suggestion with the permission of the State and Union Government.

The Authority accordingly passed the following Resolution :

RESOLUTION NO.514 :

"RESOLVED THAT the Authority hereby approves the formation of the Society to be named as "Maharashtra Nature Park Society, Bombay" under the Societies Registration Act, 1860, under the Bombay Metropolitan Region Development Authority.

"RESOLVED FURTHER THAT the draft Memorandum of Association and the Rules enclosed as Annexure 'Y' to the item note, be and are hereby approved subject to the modification that provisions regarding the Executive Committee of the Society be deleted and subject further to such modifications as may be suggested thereto by the Registrar of Societies (The Charity Commissioner, Bombay) which the Metropolitan Commissioner be authorised to consider and accept.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner

be ....

be authorised to take further action in this regard in getting the Society registered under the Societies Registration Act, 1860 and take all actions in this regard which may be incidental and deemed necessary.

"RESOLVED FURTHER THAT the Mahim Nature Park be named as 'Rajiv Nature Park' or Rajiv Gandhi Nature Park' as may be permitted by the State and the Union Government and the Metropolitan Commissioner be also authorised to approach the State and the Union Government in the matter."

<u>ITEM NO. 4</u> : Notification issued by the BMRDA under Section 13 of the BMRDA Act, 1974 requiring prior permission <u>for certain types of developments.</u>

After a prolonged discussion, the Authority agreed with the proposal contained in the Item note - namely to repeal the Notification issued by the BMRDA on 10th October, 1991 and accordingly passed the following Resolution :

<u>RESOLUTION NO.515</u> :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under Section 13 of the BMRDA Act, 1974 read with Section 21 of the Bombay General Clauses Act, 1904 and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby accords its sanction to rescind and repeal the Notification No.A/RDM/1091/910, dated 10th October, 1991, with immediate effect.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to publish a suitable Notification in the Maharashtra Government Gazette duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7A of the said Act and take all other necessary steps to implement the Resolution."

<u>ITEM NO. 5</u> : Regional Plan for Extended B.M.R. (Pen-Alibag) (1981-2001) - <u>modification to -</u>

After discussion, the Authority decided that (1) in respect of Holiday Homes in the extended B.M.R. (Pen-Alibag), the maximum built-up area of plot shall not exceed 20% of the plot area (FSI 0.2) instead of 50% of the plot area as at present, and (2) the size of the plot to be used for such purpose shall not be less than 1 hectare instead of 0.4 hectare as at present. The Authority accordingly passed

the ....

the following Resolution :

RESOLUTION NO.516 :

"RESOLVED THAT the Authority hereby recommends to Government to modify Development Control Rules of Extended B.M.R. in respect of development of Holiday Homes and Holiday Resorts as follows :

(1) Maximum built-up area for such purpose shall be 20% of the plot area (FSI 0.2), and

(2) the plot area shall not be less than 1 hectare.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to communicate to Government the recommendations of the Authority for publication in exercise of its power under sub-section (2) of Section 20 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 for inviting suggestions and objections from public and to take further action as necessary to accord its final approval."

ITEM NO. 6 : Approval to enter into Tripartite Agreement with the Government in UDD and the Landholders, M/s. Mukand Iron & Steel Works Ltd. (now renamed as Mukand Ltd.) in respect of the land held by them at Pawai.

The Authority noted that the Govt. has already agreed in principle to enter into Tripartite Agreement in respect of some of the landholders, viz. Sharma & Verma families, etc. in Pawai Area Development Scheme for the development of land admeasuring about 86.04 hectares in Pawai and Tirandaz villages, Taluka Kurla, Bombay Suburban District. M/s. Mukand Ltd. who were having about 6.8559 hectares land in the said Pawai Area Development Scheme have requested to allow them to develop the land held by them on the similar terms and conditions as prescribed in the Tripartite Agreement referred to above. Since this was a part of the land development scheme initiated by the BMRDA, the Authority was of the view that they should be allowed the necessary permission to develop the land on the similar terms and conditions as are prescribed in case of lands of Sharma & Verma families, etc., with modifications that if the Central Govt. agencies who had initiated acquisition proceedings before the execution of the Tripartite Agreement between the State Govt., BMRDA and the landholders on 19.11.19 failed to respond to the offer of the 53% of land within a per

of.....

of six months, the offer will lapse. The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.517 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-Section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves to enter into Tripartite Agreement with the Government in Urban Development Department and M/s. Mukand Limited, for the development of the land admeasuring about 6.8559 hectares bearing below noted survey description on the same conditions as mentioned in the Tripartite Agreement executed on 19.11.1986 between the State Govt., BMRDA and the Sharma & Verma (and others) subject to the modifications that 53% of the total land shall be offered to the Central Govt. agencies at a price to be determined by the Director of Town Planning and if the offer is not accepted within a period of six months, the offer will lapse.

| Survey No. | CTS No. | Total area in Sq. yds. | Total area in Sq.mtrs. |
|---|---|---|---|
| 8 Part | 15 Pt. | 82,000 | 68,559 |
| 8 Part | 16 Pt. | | |
| 16 Part | 24 Pt. | | |
| 17 Part | 13 Pt. | | |

"RESOLVED FURTHER THAT M/s. Mukand Limited shall unconditionally withdraw the suit filed by them in the Bombay High Court to delete this land from acquisition upon the execution of the Tripartite Agreement mentioned above.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to prepare the Tripartite Agreement so as to facilitate the development of land held by M/s. Mukand Limited and submit the same to the State Government for further necessary action."

ITEM NO.7 : .......

ITEM NO. 7 : Appointment of BMRDA as Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area - Delegation of powers pertaining to Chapter IV of MR&TP Act, 1966 to Ulhasnagar, Ambernath, Badlapur Municipal Councils.

The Authority approved the proposal contained in the Item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.518 :

"RESOLVED THAT the Authority hereby directs under Section 151(3) of the MR&TP Act, 1966, that all powers exerciseable by it as Special Planning Authority under Chapter IV of the MR&TP Act shall be exercised by the Chief Officer of Ambernath, Badlapur and Ulhasnagar Municipal Councils for the areas included within their respective limits."

Before the conclusion of the meeting, the Metropolitan Commissioner referred to the resignation of Shri Sushilkumar Shinde, the Hon'ble Minister for Urban Development & the Chairman of the Authority with effect from 1st June, 1992 and requested the Authority to join him in placing on record the highest appreciation of the valuable and sterling services rendered by him to the Authority during his tenure as Chairman. The Authority endorsed the proposal with acclamation and passed the following Resolution :

RESOLUTION NO.519 :

"RESOLVED THAT the Authority do place on record its highest appreciation of valuable and sterling services rendered by Shri Sushilkumar Shinde as the Chairman of the Authority from 8th March, 1990 todate and wish him greater success in his future career."

The Chairman thereafter thanked the Authority in appropriate terms.

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-.-.-